
म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय वा० वा०
दा. क्र. १०७९२
१००८३
१०७९३
१००८३
IRBK-0110793

ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बालवा.
दा. क्र. १०७९२



# वॉल्ट डिस्ने



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



# वॉल्ट डिस्ने

IRBK-0110793

लेखक : प्र. न. जोशी

किंमत रु. १-५०

व्हीनस प्रकाशन, पुणें २

प्रकाशक
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
३८१ क, शनिवार, पुणें

मुद्रक
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव, पुणें

सजावट
सुधाकर खाजगीवाले

आवृत्ति पहिली
सप्टेंबर १९६४

मूल्य दीड रुपया

' रेणुका ' लक्ष्मीपार्क
नवी पेठ पुणे २
स्वातंत्र्यदिन १९६४

श्री

प्रिय मित्रानो,

तुम्हांस सिनेमा आवडतो ना ? कार्टून चित्रें किंवा प्राण्यांचे चित्रपट तर तुम्हांस फारच पसंत असतात. त्यांच्या उड्या, त्यांचे डोळे मिचकावणें, त्यांच्या क्रीडा, त्यांचें जीवन या मन आनंदित करणाऱ्या गोष्टी आहेत. मिकी माऊस, स्नो व्हाईट, सिंड्रेला, फँटेशिया, ट्वेंटी थाउजंड लीग्ज अंडर दि सी, लिव्हिंग डेझर्ट इत्यादि। जगप्रसिद्ध चित्रपट तयार करणाऱ्या कल्पक व प्रतिभावान माणसाचें नांव आहे माहीत तुम्हांस ? वॉल्ट डिस्ने असें त्याचें नांव आहे. त्याची चरित्रकथा हा एक अद्भुत व रोमांचकारी असा चित्रपटच आहे. त्याच्या जीवित – कथेंतील कांहीं प्रसंग तुमच्यासाठीं मी येथें मांडून दिले आहेत. तुम्हांस ते फार आवडतील अशी मला आशा आहे. वॉल्ट डिस्नेचे चित्रपट जरूर पहा तुम्ही जेव्हां संधि येईल तेव्हां. असो.

तुमचा

**प्र. न. जोशी**

## आमचें मनोगत

चित्रपटसृष्टीचा जादूगार वॉल्ट डिस्ने यांची चरित्रकथा आमच्या लहानथोर वाचकां-साठीं प्रसिद्ध करतांना आम्हांस अतिशय आनंद होत आहे. डिस्ने यांच्या अद्‌भुतरम्य चरित्रांतील कांहीं विशेष प्रसंग आणि त्यांच्या कांहीं विख्यात चित्रपटांचे निर्मिति-प्रसंग आमच्या सर्व वाचकांना मनापासून आवडतील अशी आमची खात्री आहे.

१५ ऑगस्ट १९६४ — प्रकाशक

अनुक्र. ८७३८० दि. ८.१२.१९७१ ११ दि. ९.१२.१९७१

# वॉल्ट डिस्ने यांचे कांहीं गाजलेले चित्रपट

+ स्नो व्हाईट अँड सेव्हन ड्वार्फ्स
+ सिंड्रेला
+ अलाईस इन वंडरलँड
+ फँटेशिया
+ ट्वेंटी थाउजंड लीग्ज अंडर दि सी
+ लिव्हिंग डेझर्ट
+ व्हॅनिशिंग प्रेअरी
+ सील आयलंड
+ इन बीव्हर व्हॅली
+ सीक्रेट्स ऑफ नेचर

वॉ...२



तुम्हांला कोणता प्राणी आवडतो ? कुणास मोर आवडेल, सुरेख पिसांचा आपला राष्ट्रीय पक्षी तो. कुणास पोपट आवडेल, हिरव्या रंगाचा व तांबड्या लाल चोंचीचा. किती गोड शब्द तो बोलतो. कुणास स्वतःच्या घरचा कुत्रा आवडेल, कुणास हत्ती, कुणास हरिण, कुणास रंगीबेरंगी मासे, कुणास लुकुलुकु पाहणारीं सशांचीं पिलें, कुणास शहामृग, कुणास पांढरा शुभ्र बगळा, कुणास राजहंस. कुणाची आवड कशी असेल कुणी सांगावें ? आतां सांगा उंदीर कुणास आवडतो ? उंदीर ? शीः ! उंदीर हा काय आवडणारा प्राणी आहे ? ना रंग, ना रूप ! घाणेरडा, किळसवाणा प्राणी ! कुणासहि तो आवडणार नाहीं. पण याच उंदराच्या पराक्रमाची कथा आज मी तुम्हांस सांगणार आहें.

माझ्या लहानपणीं एका पुस्तकांत मेलेल्या उंदराची एक गोष्ट होती. एका गरीब व भिकारी मुलाची थट्टा करावी म्हणून एका दानशूर श्रीमंतानें त्याला घरांतला मेलेला उंदीर देऊन टाकला. पोरास वाईट वाटलें. त्यानें त्याची शेपटी धरलीं व निघाला तसाच तो रस्त्यानें. एका वाण्यानें या पोराकडे व त्याच्या उंदराकडे पाहिलें. या वाण्याचें एक लाडकें मांजर होतें. मांजराला उंदीर फार आवडतात. वाण्यानें त्या मुलाकडून तो उंदीर घेतला व त्याच्या-ऐवजीं त्यानें पसाभर चुरमुरे पोराच्या ओट्यांत टाकले. पोरगा भुकेलेला होता. त्यांतले थोडे चुरमुरे त्यानें खाल्ले, थोडें पाणी तो प्याला. त्याची हुषारी वाढली. त्यानें एका डेऱ्यांत थंडगार पाणी घेतलें व तो गांवच्या वेशीवर वडाच्या सावलीखालीं निवांतपणें



७

बसला. उन्हाचा कहर होता. सर्व कांहीं तापून निघालें होतें. दुपारीं एक वाजतां चार मोळीवाले डोक्यांवर लाकडांच्या मोळ्या घेऊन आले. ते ओझ्यानें भारावलेले होते. अंगांतून घामाच्या धारा निथळत होत्या. त्यांनीं डोक्यावरील ओझें उतरलें व हुश्श करून झाडाच्या सावलींत ते बसले. पोरानें उरलेले चुरमुरे त्या मोळीवाल्यांना दिले. डेऱ्यांतील गार पाणी दिलें! मोळीवाले खूष झाले, आपापल्या मोळींतील चार चार लांकडें त्या पोरास त्यांनीं दिलीं. पोरानें त्या लाकडांची मोळी बांधली, गांवांत आणून विकली, मिळालेल्या पैशांतील निम्मे बाजूस ठेविले, निम्म्यांतून आणखी चुरमुरे आणिले. बरोबर गार पाणी घेऊन वेशीबाहेर वडाच्या झाडाखालीं पुनः जाऊन तो बसला. असा क्रम कित्येक दिवस त्यानें चालविला. शेवटीं पोरगा मोठा श्रीमंत झाला. त्याचें लग्न झालें, त्यानें घर बांधलें. त्याचा नांवलौकिक मोठा झाला—एका मेलेल्या उंदरामुळें पोराचें वैभव वाढीस लागलें!

ही एका मेलेल्या उंदराची गोष्ट आहे; पण मी आज तुम्हांस जिवंत उंदराची कथा सांगणार आहें. हा उंदीर चिरंजीव आहे. त्याला मरण कधींच नाहीं. त्याची कीर्ति जगांत सर्वत्र पसरलेली आहे. सर्व राष्ट्रांतील मुलांचा तर तो एक जवळचा प्यारा मित्र आहे. या उंदराचें नांव '**मिकी माऊस**'! माऊस म्हणजे उंदीर, मिकी हें त्याचें नांव. छत्तीस वर्षांपूर्वी म्हणजे सन १९२८ मध्यें न्यूयार्कच्या एका थिएटरमध्यें 'स्टीमबोट विली' नांवाचा एक छोटा चित्रपट लागला होता. त्यांत मिकी माऊस प्रथम जगासमोर आला. जगांतलें पहिलें व्यंगचित्र—कार्टून होतें हें. वॉल्ट डिस्ने या प्रतिभावान माणसानें मिकी माऊस निर्माण केला होता. पहिल्याच आठवड्यांत मिकी माऊसची व त्याच्याबरोबर वॉल्ट डिस्नेची कीर्ति साऱ्या जगांत पसरली.

कांहीं तरी अद्‌भुत, कांहीं नावीन्यपूर्ण, कांहीं चटकदार, कांहीं नवलपूर्ण देण्याचा वाल्ट डिस्नेचा नेहमींच प्रयत्न असे. अमेरिकेंतील साऱ्या जगांतील मुलांचा मिकी माऊस दोस्त बनला. सर्व जगांत त्याचा प्रवास चालू झाला. जवळजवळ पंधरा भाषांत ही फिल्म दाखविली जाऊं लागली. मिकी माऊस एक सच्चा मित्र बनला. टॉपिलिनो म्हणून तो इटालींत प्रसिद्ध झाला. मिकी माऊस म्हणून जपानमध्यें त्यानें नांव कमावलें. रॅटॉन मिकी म्हणून तो मेक्सिकोंत ओळखला जाऊं लागला. मिकी मौस म्हणून जर्मनींत त्याला प्रसिद्धी मिळाली. फिनलंडमध्यें मिकी

हिरी म्हणून त्याला नांव मिळालें. शांतता, मैत्री, आदर, प्रेम यांचें एक प्रतीक म्हणजे मिकी माऊस बनला. पुढें वॉल्ट डिस्नेच्या अनेक चित्रपटांत मिकी माऊसनें अनेक नावाजलेलीं कामें केलीं. गरिबांचा, श्रीमंतांचा, लहानांचा, थोरांचा, सामान्य लोकांचा, राजे लोकांचा मिकी माऊस एक विश्वासू व नेहमी प्रिय वाटणारा सोबती बनला. फ्रँकलिन रूझवेल्ट, अमेरिकेचे अध्यक्ष व इंग्लंडची राणी मेरी यांनींहि मिकी माऊसला जवळ केलें होतें.

या मिकी माऊसनें वाल्ट डिस्नेला केवढी कीर्ति मिळवून दिली ! केवढें वैभव मिळवून दिलें ! आपली कल्पनाहि थिटी पडेल असें ऐश्वर्य वॉल्ट डिस्नेला या मिकी माऊसनें मिळवून दिलें. गेल्या तीस पस्तीस वर्षांत सर्वोत्तम चित्रपटासाठीं असणारीं किती बक्षिसें वॉल्ट डिस्नेला मिळावींत ? दर वर्षी एक याप्रमाणें तीस ? दरवर्षी दोन याप्रमाणें साठ ? तीन याप्रमाणें नव्वद ? नाहीं. वॉल्ट डिस्ने यांच्या कॅलिफोर्नियांतील बरबँक येथील स्टुडिओंत त्यांच्या टेबलावर आणि पाठीमागें, मागेंपुढें असणाऱ्या कपाटांतून त्यांना मिळालेलीं निरनिराळीं बक्षिसें आपणांस दिसतील ! त्यांची संख्या आहे सातशेंच्या वर ! स्वतः वॉल्ट डिस्ने, त्यांचे सहकारी, त्यांचे छायाचित्रकार आणि त्यांनीं तयार केलेली, मिकी माऊस, डोनाल्ड डक, गूफि दी डॉग, सिंड्रेला, स्नो व्हाईट, प्लुटो, डंबो, बँबी ही सारी प्रजा यांच्यावर खूष होऊन सातशेंच्यावर सन्मान-चिन्हें लोकांनीं अर्पण केलीं. या मानचिन्हांनींच एक मोठी खोली भरून गेली आहे.

मिकी माऊसनंतर वॉल्ट डिस्नेनें शेकडों लहानमोठे चित्रपट तयार केले. त्यांत व्यंगचित्रें (कार्टून्स) होतीं. निसर्गचित्रें होतीं. अद्भुत कथा होत्या; परीकथा होत्या. जंगलांतल्या-वाळवंटांतल्या प्राण्यांचें जीवन होतें, निरनिराळ्या देशांच्या सफरी होत्या. अमेरिकन टेलिव्हिजनसाठीं तयार केलेले कार्यक्रम तर कितीतरी होते. आणि कांहीं वर्षांपूर्वी वॉल्ट डिस्नेचें आणखी एक स्वप्न सत्यसृष्टींत आलें. सन १९५४ मध्यें वॉल्ट डिस्ने यांनीं कॅलिफोर्नियांतील लॉस एंजल्स जवळ २४४ एकर जागा खरेदी केली आणि त्या ठिकाणीं प्रारंभीचे म्हणून ४,७००,००० डॉलर्स खर्च करून त्यांनीं एक अद्भुत अशी मायानगरी उभी केली. जगांतील लाखो लोक या मायानगरींत तेथील अद्भुत वैभव पाहण्यासाठीं येतात आणि थक्क होऊन जातात. या मायानगरीचें नांव **डिस्नेलँड** असें आहे; एकट्या या डिस्नेलँडमधून सन १९६२ मध्यें डिस्ने कॉर्पोरेशनला ७४, ०५९००० डालर्सचें उत्पन्न झालें. त्यांतील ५,२६३,००० डॉलर्सचा निव्वळ फायदा होता. या सर्व रकमांना पांचनें गुणा म्हणजे त्यांचे रुपये होतील ! एवढी ही संपत्ति, एवढी ही कीर्ति वॉल्ट डिस्ने यांनीं मिळविली, त्यांच्या चित्रपटांचें उत्पन्न शिवाय आहेच. या सर्व ऐश्वर्याचें मूळ आहे मिकी माऊस व त्याचा कल्पक वॉल्ट डिस्ने. या वॉल्टचीहि कथा अशीच अद्भुत-रम्य आहे.

वॉल्ट डिस्नेची जीवितकथा अति रम्य आणि प्रभावित करणारी



९


आहे. जवळून दर्शन घ्यावयाचें असेल तर चला माझ्याबरोबर प्रवासाला. चार पांच वर्षांपूर्वीची ही हकीगत आहे. अमेरिकेंत असतांना कांहीं कारणासाठीं मी पश्चिम किनाऱ्यावरील लॉस एंजल्स, सान्फ्रान्सिस्को या मायानगरींकडे सर्वांचा मोहरा वळला असतांना, अरिझोन स्टेटमधील टयूसानच्या निर्जन डोंगरांकडे चाललों होतों. सिल्व्हरसिटीचे मि. पेज यांच्या गाडीनें आम्ही तीन-चार जण टयूसानकडे निघालों होतों. गाडीच्या वेगापेक्षां माझें बालमन वेगानें धावत होतें. टयूसानच्या परिसरांत अखंडपणें पसरणाऱ्या वाळवंटाकडे व तेथें वाढणाऱ्या कॅक्टसकडे म्हणजे निवडुंगाकडे माझें चित्त गुंतून राहिलें.

तीन-चार पुरुष उंच वाढणारे सर्वेरो निवडुंग आणि या निवडुंगाच्या विश्वांत जीव धरून राहणारी प्राणिसृष्टि पुण्यास असतांनाच माझ्या मनांत घर करून राहिली होती. वॉल्ट डिस्नेचा ‘ लिव्हिंग डेझर्ट ’ हा चित्रपट माझ्या मनास अस्वस्थ करणारा वाटला. चित्रपटांत ना संगीत ना नृत्यविलास; ना स्त्रीपुरुपांचा उन्मत्त प्रणय. केवळ वाळवंटांतील सजीव निसर्ग वॉल्ट डिस्नेनें चित्रित केला आहे. तेथें नृत्य आहे, प्रणय आहे, संगीत आहे पण हा सर्व विलास प्राणिजीवनांतील आहे. वॉल्ट डिस्नेची ही कलाकृति मीं पुण्यास पडद्यावर पाहिली होती आणि नंतर टयूसानच्या आसपास त्या सृष्टीचें प्रत्यक्ष दर्शन घेऊं इच्छित होतों.

‘ लिव्हिंग डेझर्ट ’ ज्या कारणासाठीं माझ्या लक्षांत राहिला त्याच कारणासाठी डिस्नेचाच ‘ ट्वेंटि थाउजंड लीग्ज अंडर दि सी ’ सुद्धां माझें मन नाचवणारा होता. सिंड्रेला, स्नो-व्हाईट, अलायस इन् दि वंडरलँड यांसारखे चित्रपट मीं लहान मुलांच्या अधीरतेनें नि उत्सुकतेनें पाहिले होते. आणि याच जिज्ञासेच्या पोटीं

मी अमेरिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील मायानगरींना सोडून न्यू मेक्सिको, ॲरिझोना या स्टेट्समध्यें भटकत होतों. टयूसानला जाण्याच्या आधींच नोव्हेंबर डिसेंबर महिन्यांत वॉल्ट डिस्ने-संबंधींची माहिती 'सॅटर्डे इव्हिनिंग पोस्ट' मधून मीं वाचली होती. डिस्नेची मुलगी डायनी डिस्ने मिलर हिनें '**माय डॅड, वॉल्ट डिस्ने**' या नांवाखालीं आठ लेख लिहून आपल्या जगप्रसिद्ध पित्याचें विश्वसनीय चरित्र प्रथमच जगापुढें ठेविलें होतें. आपल्या वडिलांनी लहानपणीं अति हलाखीचे दिवस कसे काढले, कॉमिक कार्टून्सना कशी सुरुवात झाली, त्यांतील यशाची चढती कमान कोणत्या संकटांतून उभी राहिली, निसर्गाच्या चित्रणाकडे आपले वडील कसे वळले, मोठेमोठे स्टुडिओज त्यांनीं कसे उभे केले, मिकी माऊसचा जन्म कसा झाला, डिस्ने लॅंडची अद्भुत जादुनगरी कशी उभी राहिली, टेलिव्हिजनच्या दैनिक कार्यक्रमामुळें आपले 'डॅड' अमेरिकेंतील घरोघरीं लोकांना कसे आवडूं लागले इत्यादींचें मोठें अद्भुत चित्र वॉल्ट डिस्ने यांच्या मुलीनें रंगविलें होतें. टयूसानला जातांना त्यांतील अनेक चित्रें माझ्या डोळ्यांसमोर सरकत होतीं.

अमेरिकेंत रोज संध्याकाळीं टेलिव्हिजनवर वॉल्ट डिस्नेचा बहुरंगी कार्यक्रम असावयाचा. लहान-मोठे सारेच श्रोते-प्रेक्षक त्यावर एकदम खूष असत. मिकी माऊस हा अमेरिकेंतील मुलांचा मोठाच दोस्त होता. याच्या नावें मुलांचे अनेक क्लब्स स्थापन झाले आहेत. मिकी माऊस, डोनाल्ड डक यांच्या विचित्र लीलांनीं व व्यंगपूर्ण करामतींनीं सारे गुंग होऊन जात आणि मधूनच टेलिव्हिजनच्या पडद्यावर डिस्नेलॅंडमधील 'टुमारो लॅंड' 'फॅंटसी लॅंड' या विभागांतील अद्भुत दृश्यें बोलूं लागत. कधीं एखादा परीची वा चेटकीची गोष्ट असे, कधीं अलास्कामधील एस्किमोचें जीवन चित्रित केलेलें असे, कधीं आफ्रिकन लायनच्या क्रीडा असत, कधीं अमेरिकन-इंडियन्सचीं नृत्यें असत, कधीं रॉकेटचीं उड्डाणें असत, कधीं दक्षिण-ध्रुवावरील पेनग्विन पक्ष्याबरोबर सहल असे आणि या सर्वांना अद्भुत आणि व्यंगपूर्ण





लीलांनीं रंजविणारी मिकी माऊस व डोनाल्ड डक यांची जोडी. ही जोडी जगांतील मुलांची आवडती बनली आहे. एका उंदराला एवढें मोठें आंतरराष्ट्रीय व्यक्तिमत्त्व लाभलें तें वॉल्ट डिस्नेच्या जातिवंत प्रतिभेमुळें. आपल्या मुलांच्यापेक्षां वॉल्ट डिस्नेचें प्रेम मिकी माऊस, डोनाल्ड डक, थ्री लिट्ल पिग्ज, सिंड्रेला, स्नो-व्हाईट या स्वतःच्या मानसप्रजेवर फार आहे. डिस्नेच्या समृद्ध व कलासंपन्न प्रतिभेचीं हीं अपत्यें चित्रपटाच्या सृष्टींत अमर झालीं आहेत. मिकी माऊसवर त्याचें प्रेम विशेष असावें, कारण ‘ मिकी माउस ’ वॉल्ट डिस्नेला ‘ झाला ’ आणि त्याची कीर्ति शिखरावर पोचली.

चुलत्याचें तुटपुंजें साह्य घेऊन १९२३ च्या सुमारास वॉल्ट डिस्नेनें लॉस एंजल्समध्यें कार्टून्स तयार करण्याचा प्रयत्न चालू ठेवला. त्याची फार कोठें ओळख नव्हती, हॉलीवूडच्या यक्षनगरींत त्याला कोणी विचारीत नव्हतें, कशीतरी संधि साधून एखादद्दुसरा स्टुडिओ त्यानें मन लावून निरखून पाहिला होता; पण या वीस-एकवीस वर्षांच्या तरुण पोरास कोणी नोकरींत घ्यावयास तयार नव्हतें. एक लहानसा भाडयाचा कॅमेरा वॉल्ट डिस्नेजवळ होता. भाऊ रॉय डिस्ने याची मदत थोडीफार होई. **‘अलाईस इन कार्टून लँड’** हें त्याचें कार्टून चित्र पूर्वींच तयार झालें होतें व थोडेंफार नांवहि त्याला मिळालें होतें. आणखी कांहीं तशीं चित्रें करण्याचें त्याच्या मनांत होतें.

थोडें भांडवल उभें करण्याच्या उद्योगांत डिस्ने बंधु मग्न झाले. न्यूयॉर्कहून नव्यानें मागणी आली होती. त्यापासून ७५० डॉलर्सचा पहिल्यानें फायदा झाला. अलाईसवरच त्यांनीं प्रथमचीं कांहीं चित्रें पूर्ण केलीं. वॉल्ट डिस्ने स्वतः सर्व काम करीत असे. व्यंग्यचित्रांची सजीव हालचाल त्यावेळीं लोकांना नावीन्यपूर्ण वाटे. न्यूयॉर्कला या चित्रांना फार महत्त्व येत होतें. म्हणून आणखी पुढलीं चित्रें तयार करीत असतांनाच डिस्ने बंधूंची पहिली ऑर्डर रद्द झाली. पुनः परिस्थिति गंभीर झाली. थोडी काटकसर करून लहानसा स्टुडिओ उभा करण्यांत आला होता. ‘लिलिअन बाऊंड्स’ नांवाच्या मुलीशीं वॉल्टनें याच सुमारास लग्न केलें.

लॉस एंजल्सला वॉल्ट डिस्ने यानें महिन्यास चाळीस डॉलर्स देऊन एक घर भाडयानें घेतलें. तिथे त्यांचा संसार सुरू झाला. कांहीं नवीं चित्रें डिस्नेच्या नांवानें न्यूयॉर्ककडे लोकप्रिय होत होतीं. मध्येंच चित्रांचे वितरक व डिस्नेबंधु यांचे मतभेद होत. वॉल्ट डिस्ने आपल्या पत्नीबरोबर या वेळीं न्यूयॉर्कला आला होता. आपलीं कार्टून्स दाखविणारे खूप नफा मिळवतात, आपल्याला त्याचा वांटा कां मिळूं नये ? असें त्याच्या मनांत आलें. चित्रांचा वितरक आपल्या स्टुडिओमधील चित्रकारांना स्वतंत्रपणें कांहीं लालूच दाखवीत असल्याचें डिस्नेच्या ध्यानीं आलें, त्यांचे करार एकदम संपले. अर्थात् पुढल्या उत्पन्नाची बाबहि खुंटली.

वॉल्ट डिस्ने प्रतिकूल परिस्थितींत कधीं निराश होणारा नव्हता. लागलीच त्याचें विचारचक्र नव्या उपक्रमाच्या दिशेनें फिरूं लागलें. कार्टूनमधील व्यंगचित्रें बोलूं लागलीं तर काय बहार होईल ?



या एका विचारानें डिस्नेचें चित्त भारावून गेलें. आपल्या पत्नीबरोबर वॉल्ट डिस्ने पश्चिमेस लॉस एंजलसकडे येण्यास निघाला. सबंध अडीच-तीन हजार मैलांचा प्रवास रेल्वेनें करतांना एकच विचार त्याला त्रस्त करून सोडीत होता. अगदीं नवें चित्र, बोलकें चित्र त्याला हवें होतें. मिसिसिपी नदी ओलांडल्या-नंतर वॉल्ट डिस्नेनें पत्नीस सांगितलें—

"ठरलें! अगदी नवीन कल्पना; नवा प्राणी माझ्या मनांत आहे. उंदीर, मॉर्टिमर माऊस, तुला पसंत आहे?"

"हा प्राणी ठीक आहे, पण नांव जरा बदलूं या."

"कां?...बरं, कांही हरकत नाही. 'मिकी माऊस'...कसें काय नांव!" आणि या कलावंत पति-पत्नीच्या संभाषणांतून वॉल्ट डिस्नेच्या प्रतिभेंत मिकी माऊसचा जन्म झाला. फार पूर्वी कॅन्सस सिटीला असतांना वॉल्ट डिस्ने ज्या खोलींत रात्रभर जागून काम करीत असे तेथें कांही उंदीर येऊन त्याला त्रास देत असत. उंदीर म्हणजे कांहीं जवळ बाळगावा असा प्राणी आपणास वाटत नाहीं, पण वॉल्ट डिस्नेला या मित्रांबद्दल ममत्व निर्माण झालें आणि त्यानें आपल्या टेबलावर एका छोट्या पिंजऱ्यांत त्या उंदरांना ठेवून दिलें. त्यांचा त्याला लळा लागला. त्यांतील एक त्याचा विशेष लाडका होता. त्याचें वेड डिस्नेच्या मनांत कायमचें रुजलें होतें, तें मिकी माऊसच्या रूपानें जगप्रसिद्ध झालें.

आणि कॅलिफोर्नियांत आल्याबरोबर डिस्ने बंधु या नव्या व्यंग-चित्राकडे आपलें सर्वस्व वेचूं लागले. मिकी माऊस आकारास येत होता. याच सुमारास 'दि जाझ सिंगर' नांवाचें चित्र इतिहासांत पहिल्यानें बोलूं लागलें होतें. आतां मुक्या चित्रांचा जमाना एकदम संपणार होता. सर्वांना बोलक्या चित्राचें वेड लागलें यांत नवल नाहीं. चित्रपट बोलपट झाल्यावर वॉल्ट डिस्नेचा मिकी माऊस स्वस्थ कसा बसणार? मिकी माऊस बोलका काढावा हा ध्यास त्याच्या निर्मात्यास लागला. त्या दृष्टीनें त्याचे प्रयत्न सुरू झाले. मिकी माऊसच्या फिल्मवरच ध्वनिमुद्रण करावें म्हणून डिस्ने न्यूयॉर्कला आला. तेथेंहि डिस्नेच्या मनांतील कल्पना आणि इतर चित्रपट-निर्मात्यांच्या योजना यांचा मेळ बसेना. चित्रपटाच्या फिल्म्स व ध्वनीच्या रेकॉर्डस् वेगवेगळ्या असण्यापेक्षां फिल्मवरच ध्वनिमुद्रण करावें ही वॉल्ट डिस्नेची कल्पना कोणाच्याहि नीट ध्यानीं येईना. एका कंपनीनें तसें करण्यासाठी डिस्ने बंधूंना ३५०० डॉलर्स मागितले. एवढे पैसे खर्च करूनहि मनासारखें काम होण्यासारखें नसल्यामुळें दुसरीकडे खटपट करणें भाग पडलें. पैसा व परिश्रम मोठ्या प्रमाणावर खर्च होऊनहि मनासारखें काम होत नव्हतें. स्वतः वॉल्ट डिस्नेजवळ हवी तेवढी यंत्रसामग्री नव्हती. ज्यांच्याजवळ होती त्यांच्याशीं त्याचें जमत नव्हतें.

कॅलिफोर्नियांत वॉल्टचा बंधु राय हाहि पैशाच्या विवंचनेंत होता. स्टुडियोंतील कांही सामान विकून त्यानें वॉल्टला हजार-बाराशें डॉलर्स न्यूयॉर्कला पाठविले. एडवर्डी व पॅट पॉवर्स या सह-काऱ्यांच्या मदतीने शेवटीं एकदां फिल्मवर ध्वनिमुद्रण यशस्वी झालें. सुलभ रीतीनें मिकी माऊस बोलका झाला. पहिल्या बोलक्या मिकी माऊसच्या फिल्मचें नांव होतें 'स्टीमबोट विली'.



वॉल्टच्या कर्तृत्वावर अजून कोणाचा विश्वास नव्हता. बोलकीं कार्टून्स चित्रें कितपत यशस्वी होतील याबद्दल सर्वांना संशय होता. कॉलनी थिएटरच्या मालकानें वॉल्टचें चित्र दाखविण्याचें मान्य केलें. आठवड्याच्या अखेरीस पांचशें डॉलर्स वॉल्टला मिळणार होते. यापूर्वी कार्टूनला एवढी रक्कम कोणीं दिलेली नव्हती. वॉल्टच्या एका नव्या पराक्रमाची साक्ष जगास पटणार होती. चित्र सुरू झालें आणि मिकी माऊसच्या लीला पाहून प्रेक्षकांची हसतां हसतां पुरेवाट झाली. हें पाहून वॉल्टहि मनापासून खूष होत राहिला. मिकी माऊस बोलका झाला होता! कार्टून चित्र बोलूं लागलें होतें. वृत्तपत्रांत स्तुतीचा वर्षाव वॉल्ट डिस्नेवर होऊं लागला. ज्यांनीं वॉल्टला व त्याच्या अशक्य वाटणाऱ्या कल्पनांना नावें ठेविलीं होतीं, त्यांच्याच उड्या मिकी माऊसवर पडूं लागल्या. प्रत्येकाला आपल्या गांवीं थिएटरमध्यें मिकी माऊस हवा होता. प्रेक्षक मिकी माऊसबरोबर नाचूं लागत. दुसरीं कोणतींहि कार्टून्स त्यांच्या पसंतीस येईनात. मिकी माऊस, मिकी माऊस या एकाच घोषणेनें अमेरिकेंतील चित्रपटसृष्टि दुमदुमून गेली. पैसाहि खूप मिळूं लागला. युरोपमध्येंहि मिकी माऊस लोकांचा जिवलग मित्र बनला.



या सर्व दगदगीनें वॉल्ट डिस्नेची प्रकृति एकदम खालावली. अविरत परिश्रम झाले आणि प्रकृतीनें दगा दिला. कांहीं दिवस व्यवसाय बंद ठेवण्याबद्दल डॉक्टरनीं सल्ला दिला. तो मानण्याशिवाय वॉल्टला गत्यंतर नव्हतें. डिस्ने आपल्या पत्नीसह सेंट लुई येथें आला. तेथून मिसिसिपींतून बोटीनें न्यू ऑर्लिन्स या दक्षिणेकडील बंदराकडे जाण्याचा त्याचा विचार होता; पण बोट न मिळाल्यामुळें हें जोडपें एकदम वॉशिंग्टनला येण्यास निघालें.



माऊंट व्हर्नोन हें वाशिंग्टनचें निवासस्थान अमेरिकन माणसास तीर्थस्थान वाटतें. वॉल्ट डिस्नेनें तेथील निसर्गशोभा लुटली. त्याच्या मनावर आलेलें दडपण हळूहळू कमी होत राहिलें. त्यानंतर हवाना, पनामा करून डिस्ने पति-पत्नी परत हॉलीवूडमध्यें येऊन दाखल झाले. आतां वॉल्टचा जणू नवा अवतार झाला होता. नव्या उद्योगांकडे त्याची हिंमत वळूं पाहत होती.

नित्य नवें शोधणें हा वॉल्ट डिस्नेच्या प्रतिभेचा हव्यास होता. त्याचीं कार्टून्स आतां बोलकीं होतीं, पण त्यांत नाना रंगांची किमया नव्हती. वॉल्टचें मन त्या दृष्टीनें भ्रमण करीत होतें. एक-दोन रंगीत चित्रपट निघाले होते, पण त्यांतील रंगसंगति बिघडून गेली होती. एकमेकांत रंग मिसळले होते आणि प्रेक्षक यावर नाराज होते. वॉल्ट डिस्नेनें या नव्या उद्योगाकडे आपलें लक्ष वळवलें. लता-वृक्षांचा व झाडा-फुलांचा डिस्नेला मनापासून षोक होता. वेगवेगळ्या निमित्तांनीं तो आपल्या मुलींना व पत्नीला नाना प्रकारचीं फुलें भेट पाठवी. नाना फुलांचे रंग फिल्ममध्यें यावेत हें



त्याच्या मनानें एकदां घेतलें कीं, दुसरें कांही सुचत नसे त्याला. तोच एक ध्यास.

फ्लॉवर्स अँड ट्रीज हें त्याचें एक चित्र अर्धे तयार झालें होतें. हेंच पुनः तीन रंगांत काढावें असें त्याच्या मनानें घेतलें. त्याचा भाऊ रॉय म्हणाला, "खर्च दुप्पट होईल. हें चित्र पहिल्यानें ठरल्यासारखें काळ्या-पांढऱ्या रंगांतच काढूं. निम्में तर उरलें आहे. सर्व तीन रंगांतच म्हणजे पुनः पहिल्यापासून प्रारंभ..." पण वॉल्टला यांतलें कांहींहि पटलें नाहीं. कसें पटणार? त्याचें चित्त फुलांच्या नाना रंगांत भिजून चिंब झालें होतें. वसंत ऋतूस सुरु-



वात आहे. नाना पक्षी क्रीडा करीत आहेत. विविध रंगांचीं फुलपांखरें बागडत आहेत. निरनिराळ्या रंगांचीं फुलें उमललीं आहेत.... हें सारें रसदार व रंगपूर्ण विश्व काळ्या-पांढऱ्या रंगांत चितारणें त्याला मूर्खपणाचें वाटत होतें. सारें हिरवें, निळें, तांबडें सौंदर्य त्यास फिलमवर टिपून घ्यावयाचें होतें. व्यवसायाचीं व व्यवहाराचीं बंधनें त्यानें कधीं मानलींच नाहींत. १९३२ सालीं त्याचें 'फ्लॉवर्स अँड ट्रीज' हें रंगीत चित्र तयार झालें. टेक्निकलर कार्टून म्हणून याला खूप प्रसिद्धी मिळाली. या चित्रास मोशन पिक्चर अवॉर्ड मिळून वॉल्ट डिस्नेचें नांव ज्याच्या त्याच्या तोंडीं झालें. एखाद्या कार्टूनला अशा प्रकारचा सन्मान प्रथमच मिळत होता.

याच सुमारास मिकी माऊसच्या नवीन आवृत्ति निघत होत्या. प्लुटो हें कुत्रें, डोनाल्ड डक हें बदक, गूफी हें आणखी एक कुत्रें इत्यादि सोबती मिकी माऊसबरोबर लोकप्रिय झाले. प्रत्येकाच्या तऱ्हा वेगळ्या होत्या. चालण्याच्या, बोलण्याच्या लकबा निश्चित झाल्या होत्या. आवाज ठरून गेले होते. व्यक्तिमत्त्व तयार झालें होतें. डोळ्यांच्या व ओठांच्या हालचालींमुळे सजीव कार्टून्समध्यें नवें चैतन्य आलें होतें. १९३३ मध्यें '**दि थ्री लिटल् पिग्ज**' नांवाचें एक कार्टून डिस्नेनें प्रसिद्ध केलें. यावेळीं त्याची कीर्ति शिगेस पोंचली. त्यांतील 'व्हूज अफ्रेड ऑफ् दि बिग बॅड वूल्फ ?' गाणें ज्याच्या त्याच्या तोंडीं होतें. मुलांच्या पालकांच्या पसंतीस हेंहि चित्र एकदम उतरलें. पालकांचें एक मासिक अमेरिकेंत प्रसिद्ध होत असतें. या मासिकातर्फे डिस्ने स्टुडियोंत वॉल्टचा सत्कार करून त्याला एक पारितोषिक द्यावें असें पालकसंघानें ठरविलें.


समारंभास सुरुवात झाली. स्वतःवर स्तुतीचा वर्षाव होत अस-

तांनाच एक निरोप आला. आणि त्यामुळें वॉल्ट डिस्नेला सभा सोडून बाहेर जावें लागलें. थोड्या वेळानें सभेच्या अध्यक्षांकडे एक चिठी आली. अध्यक्ष संभ्रमांत पडले. जमलेल्या लोकांना त्यांनी एक बातमी दिली. "वॉल्ट डिस्नेचें हें पारितोषिक त्याचे वतीनें मलाच घ्यावें लागेल. कारण त्याची पत्नी याच वेळीं त्याला आणखी एक जिवंत पारितोषिक देणार आहे. वॉल्ट डिस्ने खऱ्या अर्थानें आपल्या पालक संघाचा सभासद होत आहे–" वॉल्ट डिस्नेस या वेळीं पहिली मुलगी झाली होती.

मिकी माऊस, डोनाल्ड डक, प्लुटो, गूफी या साऱ्यांनीं अमेरिकेंतील मुलांना नादावून सोडलें. थ्री लिटल् पिग्ज त्यांच्या जोडीस आलीं. बाजारांत हींच खेळणीं; शाळांतून हीच चर्चा, थिएटर्स्‌मधून हींच कार्टून्स. वॉल्ट डिस्ने मुलांचा राजा बनला होता. डिस्ने आणि त्याची ही प्रजा यांना आंतरराष्ट्रीय कीर्ति मिळाली होती. जात, धर्म, राजकारण यांच्या पलीकडे जाऊन, वॉल्ट डिस्नेच्या कलाकृति जगांतील मुलांना हंसवीत होत्या, नाचवीत होत्या. आंतरराष्ट्रीय ऐक्यभाव निर्माण व्हावा म्हणून त्या राष्ट्रसंघानें, लीग ऑफ् नेशन्सनें वॉल्ट डिस्नेला एक पदकहि देऊन टाकलें.



यानंतर डिस्नेच्या संपन्न कल्पनेंत एका अद्भुत विचाराने प्रवेश केला. आतापर्यंत त्याचीं कार्टून्स आठ-दहा मिनिटें चालणारीं होतीं. त्यांची लोकप्रियता अमाप असली तरी त्यावर संतुष्ट राहून डिस्नेचें भागण्यासारखें नव्हतें. मिळालें तेवढ्याच पुढल्या कलाकृतींत खर्च करावयाचा एवढेंच त्याला माहीत होतें; आतां एका नव्या साहसास तो प्रवृत्त झाला. जींत एक उत्तम कथा आहे, अशी दीड-दोन तास चालणारी फिल्म काढण्याचें त्यानें ठरविलें. लहान कॉर्टून्समध्यें विचित्र हावभाव आणि व्यंगपूर्ण हालचाली यांनाच महत्त्व होतें. परंतु कथात्मक कार्टूनमध्ये राग, लोभ,



करुणा, वात्सल्य यांचें दर्शन चित्रांच्या साह्यानें करणें अगत्याचें होतें आणि प्रेक्षकांचें चित्त दीड तासपर्यंत खेचून घेण्याचें काम अवघड असणार. जिवंत माणसांच्या हालचाली दाखविणें निराळें आणि चित्रांमधून जिवंत माणसें निर्माण करणें निराळें. शिवाय भडक शृंगार नाहीं, वेडेवाकडे चाळे नाहींत.

वॉल्ट डिस्नेनें हें नवें साहस करून पाहण्याचें ठरविलें. '**स्नो-व्हाईट अँड सेव्हन ड्वार्फस**' ही जगप्रसिद्ध कलाकृति त्यानें निवडली. अनेक कलाकारांचा मोठा मेळावा त्यानें आपल्याभोवतीं जमवला. तांत्रिक भागांची जुळवाजुळव केली. पैशांचा डोंगर उभा करणें प्राप्त होतें. १९३५ सालीं स्नो व्हाईटच्या निर्मितीस प्रारंभ झाला. एक मोठें काव्य पडद्यावर कार्टूनच्या रूपांत चित्रांच्या साह्यानें आणावयाचें होतें. अद्भुतता व वास्तवता यांचें मनोहारी पण चमत्कारिक मिश्रण वॉल्टसमोर डिस्नेच्या आकारास येत होतें. लहान लहान कार्टून्स आठ-दहा मिनिटांचीं, सोपीं होतीं. एखादें अपेशी ठरलें तर फार नुकसान नव्हतें, परंतु या नव्या धाडसामुळें प्रसंगीं.......पण वॉल्ट डिस्नेच्या चिरतरुण मनास याची चिंता कधींच नव्हती.

चित्रपटाचा दर्जा प्रथमपासून अखेरपर्यंत राखणें सामान्य गोष्ट नव्हती. स्नो-व्हाईटमध्यें मानवी भाव-भावनांच्या आविष्कारास महत्त्व असल्यानें काम अधिकच अवघड होऊन बसलें होतें. पांच लक्ष डॉलर्सचें बजेट तयार झालें आणि त्यास अनुसरून खर्चाचे मार्ग विविध प्रकारें प्रवाहूं लागले. पण एवढे पैसे डिस्नेबंधूंजवळ कोठें होते ? एक बऱ्यापैकीं स्टुडिओ आणि नांवलौकिक मिळालेलीं कार्टून्स एवढेंच भांडवल त्यांच्याजवळ होतें. मिळालेला पैसा कधीं शिल्लक राहील तर शपथ. वॉल्ट डिस्नेनें बँक ऑफ् अमेरिकेकडे धाव घेतली. लहान प्रमाणावर स्नो-व्हाईटच्या चित्रीकरणास सुरुवात झाली आणि खर्च भरमसाटपणें वाढूं लागला. सात बुटक्यांचें व्यक्तिमत्त्व, प्रत्येकाचें वेगळें असें निश्चित करणें महत्त्वाचें होतें. स्नो-व्हाईटची निर्मिति अजरामर व्हावयास हवी, तिच्या आवाजांत दैवी कंप असावा, तिच्या गीतांत स्वर्गीय माधुरी हवी. नाना प्रकारच्या चाचण्या झाल्या आणि ॲड्रिनी कॅसिलोनी या नांवाच्या एका नाजुक मुलीचा भावपूर्ण आवाज पसंत करण्यांत येऊन कामास जोरांत प्रारंभ झाला. या आवाजास साजेल अशी स्नो-व्हाईट जिच्यावरून सारीं चित्रें तयार होणार शोधून काढणें सोपें काम नव्हतें. आता कथारूपाने मानवी भावना चित्रित होणार असल्यानें वॉल्ट डिस्ने स्नो-व्हाईटला मॉडेल म्हणून एखादी निरागस व दैवी रूप असणारी मुलगी मिळते की काय म्हणून शोधांत राहिला. एका नृत्यशाळेंतील मार्गेरी नांवाची एक सतरा वर्षांची अप्सरा स्नो-व्हाईट म्हणून निश्चित करण्यांत आली. आणि चित्रपटाची प्रगति झपाट्यानें होत राहिली. चित्रपटाचा खर्च अनेकपटींनीं वाढला. १७००००० डॉलर्स एका चित्रपटासाठी ! कोणीं ऐकलें नव्हतें, पाहिलें नव्हतें.





योग्य वेळीं स्नो-व्हाईट चित्रपट पूर्ण झाला. न्यूयॉर्कच्या प्रख्यात रेडिओ सिटी म्यूझिक हॉलमध्यें रसिकांच्या रांगा उभ्या राहिल्या. वॉल्ट डिस्नेच्या अप्रतिम कलेचें व वैभवशाली प्रतिभेचें सर्वांनी कौतुक केलें. उत्पन्नाच्या बाबतींत या चित्रपटानें आता-पर्यंतचा उच्चांक मोडला. पहिल्याच फेरींत सर्व जगांतील खेळांचें उत्पन्न ८०००००० डॉलर्सचें झालें. खर्चाच्या पांचपट उत्पन्न प्रथम खेपेस मिळालें. डिस्नेचें नांव जगभर दुमदुमून राहिलें. मिकी माऊस, थ्री लिट्ल पिग्ज, स्नो-व्हाईट या त्याच्या यशाच्या पायऱ्या होत. सन १९५६ पर्यंत स्नो-व्हाईटनें वॉल्ट डिस्नेला १५ कोटी डॉलर्स मिळवून दिले. स्नो-व्हाईटमधील संगीत अमेरिकन जीवनाचा एक भाग बनला. मिकी माऊस व थ्री पिग्जप्रमाणेच स्नोव्हाईटची मागणी एकसारखी वाढत राहिली, या फायद्यांतून डिस्ने बंधूंनीं बरबँक येथें एक भव्य स्टुडिओ ३०००००० डॉलर्स खर्चून उभारला.



तीस लाख डॉलर्स खर्चून एक मोठें चित्रमंदिर वॉल्ट डिस्ने यानें उभारलें. याच वेळीं वॉल्टचे वयस्कर आई-वडील कॅलिफोर्नियांत राहावयास आले होते. या कर्तृत्ववान मुलानें नव्या इमारतीचें बांध-काम चालू असतांना आपल्या वडिलांना दाखविलें. आपल्या मुलानें एवढें वैभव उभें केलें याची खात्री त्यांना पटेना.

" वॉल्ट, पण काय उपयोग या मोठ्या इमारतीचा ? "


" हा स्टुडिओ आहे, इथेंच मी काम करणार. "

" नाहीं नाहीं, मी विचारतों इथें तूं काय काम करणार ? "

भाबड्या वडिलांना वाटत होतें, पोरगा धंद्यांत फसणार तर नाहीं ! आणि वडिलांचें हें वाटणें अगदींच अस्वाभाविक नव्हतें, कारण ते वॉल्टला लहानपणापासून ओळखत होते. या पोराला व्यंग्यचित्र काढण्याचा नाद लहानपणापासून होता हें खरें, पण या असल्या कलेंतून तीस लाख डॉलर्सचा स्टुडिओ ? कोणासहि अगदीं अशक्य वाटणारी गोष्ट ही.

पण वॉल्ट डिस्नेच्या कर्तृत्वाची झेप केवढी मोठी पाहा. लहान-पणीं या पोराचें काय होईल ही चिंता सर्वांना असावयाची. दारिद्र्य प्रथमपासून मूर्तिमंत उभें साथ करायला. ऐन वयांत असतांना कॅन्सस सिटींत अति कष्ट या मुलीने भोगले. कांहीं व्यंग्यचित्रें काढून तो न्हाव्याला विकत असे, कधी त्याबद्दल त्याचे केस फुकट कापून मिळत. एका दंतवैद्यासाठी त्यानें कार्टून्स तयार केलीं होतीं.

कांहीं थोडे पैसे मिळत ते रोजच्या जेवणास कसेबसे पुरत असत. बूट फाटले तर परत शिवण्यासाठीं त्याच्या-जवळ पैसे नसत. लॉफोग्रॅम कंपनींत कांहीं दिवस चित्रकार म्हणून तो काम करीत होता. कधीं पैसे अजिबात नसत, म्हणून नुसता पाव खाऊन दोन-दोन दिवस त्याला



काढावे लागत होते. जन्मापासून त्याचे असेच हाल होत राहिले.

५ डिसेंबर १९०१ रोजीं वॉल्ट डिस्नेचा जन्म झाला. तीन वर्षांपूर्वीं त्याला साठ वर्षे पूर्ण झालीं. लहानपणीं गरिबी फार. शिकॅगो येथें बालपणाचे दिवस फार वाईट गेले. पांच सेंट्सचें एखादें भिकारडें खेळणेंहि त्याला मिळालें नाहीं. शिकॅगोस नीट बस्तान बसेना, म्हणून डिस्ने कुटुंब कॅसन्स सिटीस आलें. तेथें सिटी स्टार या वर्तमानपत्राचें वाटप करण्याचें काम छोट्या वॉल्टनें पत्करलें. नऊ-दहा वर्षांचें हें पोर पन्नास-साठ घरीं रोज वर्तमानपत्रें टाकी. हिवाळ्यांत तर पहाटे तीन- साडेतीनपासून त्याला काम पडे. सहा वर्षे खडतर कामें वॉल्टनें केलीं. कांहीं वर्षांत वॉल्टला पंख फुटूं लागले. सन १९१८ च्या सुमारास त्यानें एक नवेंच काम पत्करलें. पहिलें महायुद्ध संपत आलें होतें. फ्रान्समध्यें ट्रकड्रायव्हर्सची फार जरूरी होती. वॉल्टनें तें काम पत्करून फ्रान्समध्यें प्रयाण






केलें. त्याचा व्यंगचित्रें काढण्याचा नाद याहि वेळीं वाढत होता. लाईफ व जज्ज या दोन प्रमुख अशा अमेरिकन साप्ताहिकांना तो चित्रें पाठवीत होता. फ्रान्समध्यें वॉल्टनें पैसे मिळविले, पण ते सारे घरीं प्रपंचासाठीं खर्च झाले.

वॉल्ट डिस्नेनें पुनः अमेरिकेंत आल्यावर कॅन्सस सिटींत एका कंपनींत काम पत्करलें. लहान-मोठ्या चित्रपट कंपनींत त्यानें नोकरी केली, पण कोठेंहि त्याचा नीट जमच बसेना. भांडवल नाहीं, मोठ्या ओळखी नाहींत, तेव्हां त्यानें मनाशी एक निश्चय केला. पश्चिमेकडे चित्रपटव्यवसाय भरभराटीस येत होता. आपणहि आपलें नशीब काढावें तिकडे जाऊन, असें या वीस-बावीस वर्षांच्या तरुण पोरास वाटलें आणि त्यानें सँटॅफी रेल्वेच्या गाडींत पाय ठेवला. हा कल्पक मुलगा आजवर अपेशी होऊन दैव उजळून पाहण्यासाठीं कॅलिफोर्नियास हॉलिवूडला निघाला होता. त्याच्या कपड्यांचे धागेधागे सुटून फाटण्याच्या मार्गांत होते. त्याच्या एका भिक्कार ट्रंकेंत एक शर्ट, दोन अंडरवेअर्स, दोन पायमोजे, खिशांत काही सेंट्स, बस ! एवढीच संपत्ति घेऊन तो हॉलीवूडला निघाला होता. त्याचें डोकें मात्र विविध कल्पनांनीं भारावून गेलें होतें.

या वॉल्ट डिस्नेनें कॅलिफोर्नियांत पंधरा-वीस वर्षांत अद्भुत अशी किमया केली. कोणास खरेंसुद्धां वाटेना. ज्याला पांच सेंट्स कसेबसे मिळत तो पोरगा तीस लाख डॉलर्सचा स्टुडिओ बांधतो हें त्याच्या वडिलांनाहि खरें वाटेना. वॉल्टच्या पहिल्या कार्टूनला पांच सेंटचा मोबदला मिळाला होता. त्याचें वय त्यावेळीं आठ वर्षांचें होतें आणि आता...?



१९५६ मध्ये न्यूयॉर्कच्या वॉलस्ट्रीट् जर्नलमध्यें खालील बातमी प्रसिद्ध झाली होती.

‘जून ३०, १९५६ अखेरच्या नऊ महिन्यांत वॉल्ट डिस्ने प्रॉडक्शनला एकूण नफा २०९१९७५ डॉलर्सचा झाला. एकूण जमा या काळांत २०३७१८३१ डॉलर्सची झाली.’

डिस्नेची प्रतिभा, त्याचे कष्ट, त्याची नवनिर्माण करण्याची अनिवार हौस यांतून हें सारें वैभव उभें राहिलें. डिस्नेच्या नव्या स्टुडिओंत आतां १५०० कामगार नोकरीवर आले. चित्रपट-व्यवसायाचें शिक्षण घेणारे १०० विद्यार्थी मनापासून कामांत गुंतले. वॉल्ट डिस्नेचा लौकिक वाढत होता, त्याच्या हातांत अलोट पैसा येत होता, पण तो कायमचा कोठून राहणार? नव्या आणखी भव्य उद्योगांत मिळाला त्यापेक्षां अधिक पैसा खर्च करावयास तो तत्पर असावयाचा हें ठरलेलें. अनेक आपत्ति, अनेक संकटें यांना तोंड देऊन नित्य नवी रचना करणारा तो एक महान जादुगार बनला होता.





वॉल्ट डिस्नेचीं कार्टून्स सर्व जगांत प्रसिद्ध होऊं लागलीं. लोकांना तीं आवडलीं. प्रख्यात नटनटींशिवाय चित्रपट यशस्वी करून दाखविणारा वॉल्ट डिस्ने हा एकच कल्पक कलाकार. वॉल्ट डिस्नेनें निर्जीव चित्रें बोलकीं केलीं. मानवी भावनांचा आविष्कार या चित्रांतून होत राहिला. रेखीव व औचित्यपूर्ण हावभाव हें या चित्रांचें वैशिष्ट्य बनलें. त्याग, शौर्य, दया, करुणा



वात्सल्य, प्रेम, तिरस्कार इत्यादि भावनाविकार या चित्रांच्या कथांतून आकारास आले. दीड दोन तास चालणारी चित्रपटकथा निर्माण करून वॉल्ट डिस्नेनें एक नवें कलाविश्व निर्माण केलें. प्रत्येक चित्र-पटांतील व्यक्तीची हालचाल निराळी, त्याचा पोषाख निराळा, त्याचा आवाज वेगळा, मानवी जीवनांतील अनेक भावनाविकार अद्‌भुताच्या मिश्रणांत डिस्नेच्या स्पर्शानें पुलकित झाले. स्नो-व्हाईट,



सिंड्रेला, फँटॅसिया, या चित्रपटांनीं वॉल्ट डिस्नेचें नांव जगांत दुमदुमून राहिलें.

माणसांनीं कामें केलेले चित्रपट वा बोलपट एका दृष्टीनें सहज सोपे वाटतात. पण मुक्या चित्रांच्या साह्यानें एखादी कथा बोलकी करणें अवघड काम आहे. चित्रविचित्र रूप, चमत्कारिक हालचाली, आणि गंमतीचे आवाज यांनींच केवळ व्यंग्यचित्र-कार्टून-सिद्ध होतें असें नाहीं. त्याच्या पाठीमागें अभिजात रसिकता व कल्पकता लागते. ती वॉल्ट डिस्नेजवळ होती. म्हणून त्याचीं कार्टून्स एवढीं लोकप्रिय झालीं. त्याचे चित्रपट सर्वांच्या पसंतीस उतरले. वॉल्ट डिस्नेच्या या अद्‌भुत कार्याचें वर्णन मिकी-माऊस, डोनाल्ड डक ही मंडळी सुद्धां करूं शकतात. कार्टून चित्र कसें तयार होतें हें प्रसिद्ध नॅशनल जॉग्रफिक मासिकाच्या लेखकास मिकी माऊसनेंच एकदां स्पष्ट केलें होतें. प्रथम कथालेखन विभागापासून प्रारंभ होतो. निर्मात्यांना कथा पसंत पडली म्हणजे साध्या पेन्सिलीनें काढलेलीं अनेक चित्रें येथें गोळा होतात. कथा–फलकावर तीं चित्रें अनुक्रमानें टांचणीनें चिकटविलीं जातात. एक नजर टाकली कीं कथा ध्यानांत यावी इतकीं तीं चित्रें बोलकीं असतात. कार्टूनमधील व्यक्तिचित्रें, प्रसंग ध्यानांत घेऊन, पार्श्व-संगीताची व प्रत्येकाच्या 'बोलण्याची' तयारी यानंतर चालू होते. व्यंग्य-चित्रांतील व्यक्तीच्या हावभावांचा संपूर्ण अभ्यास करून प्रत्येक हावभावाचें एकएक असें रेखीव चित्र तयार





होतें. शेजारीं आरसा ठेवून, त्यांत वेगवेगळे हावभाव पाहूनच पार्श्वभूमि मिळते. नंतर हीं सर्व चित्रें पारदर्शक सेल्युलाईडच्या पट्टीवर जशींच्या तशीं काढलीं जातात. नंतर उत्कृष्ट कॅमेऱ्याच्या साह्यानें या चित्रांचे फोटो घेऊन फिल्म तयार होते. एक फूट फिल्म-साठीं सुमारें १६ तरी चित्रें लागतात एक मिनिट फिल्म चालू ठेवा-वयाची तर १४४० चित्रें तयार असावीं लागतात. लहान कार्टून आठदहा मिनिटांचें असतें. या हिशेबानें दीडदोन तासांचा चित्रपट तयार करावयाचा म्हणजे हजारों चित्रें तयार हवींत. तूर्त तयारहोत असलेल्या ‘ दि स्वोर्ड इन दि स्टोन ’ या चित्र-पटासाठीं २२७८४० वेगवेगळीं चित्रें तयार झालीं आहेत. नंतर तयार होणाऱ्या फिल्मची पाहणी होऊन जरूर नसणाऱ्या भागाची दुरुस्ती होते, प्रसंगीं कापला जातो. नंतर तो चित्रपट स्टुडिओंतील सहकाऱ्यांना दाखविला जातो. सर्वांच्या विशेषतः वॉल्टच्या पसंतीस उतरला कीं तो रसिक प्रेक्षकांसाठीं सर्वत्र दाखविला जातो.

याचप्रमाणें फँटाशिया, डंबो, बँबी हे गाजलेले चित्रपट डिस्नेच्या स्टुडिओंत तयार झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत पुनः वॉल्ट डिस्नेस चमत्कारिक दिवस आले. स्टुडिओंतील लोकांनीं संप केला. युद्धजन्य परिस्थितीमुळे उत्पन्न घटलें. अमेरिकन सरकारच्या आग्रहा-वरून त्यानें याच सुमारास दक्षिण अमेरिकेकडे सदिच्छा प्रसारा-साठीं ट्रिप केली. तिथेंहि कांहीं फिल्म्स त्यानें तयार केल्या. दुसऱ्या महायुद्धास चांगलीच सुरुवात झाली होती. अमेरिकेनें भाग घ्याव-याचें ठरविलें. त्यानुसार तयारी होत राहिली आणि एके दिवशीं डिस्ने स्टुडिओंतच ७०० सैनिकांनीं प्रवेश केला. त्यांना राहावयास एवढी प्रशस्त व सुखसोयींनीं सज्ज अशी दुसरी जागा नव्हती.





आठ महिने त्यांचा मुक्काम तेथें होता. चित्रपटनिर्मिति जवळ-जवळ थांबली होती. नुकसानीचा तर विचारच नको. सैनिकांनीं गॅस, वीज इत्यादींचा जो खर्च केला त्याचे पैसे दोन वर्षांनीं सरकारनें डिस्ने स्टुडिओस दिले. याच सुमारास अमेरिकन नौदलासाठीं डिस्नेनें कांहीं फिल्म्स तयार केल्या. शत्रूविरुद्ध प्रचारासाठीं म्हणून डोनाल्ड डक, मिकी माऊस आतां सिद्ध झाले. डिस्नेच्या मिकी माऊसचीहि शत्रूस भीति वाटूं लागली. युद्धकाळांत या कलावंतानें केलेली कामगिरी या दृष्टीनें विशेष उल्लेखनीय मानावी लागेल. विमानें, बोटी, युद्धसामग्री यांच्या प्रतीकांसाठी वॉल्ट डिस्नेनें ४००० पर्यंत निरनिराळीं चित्रें काढलीं. नाविक दल, हवाई दल यांच्यासाठीं त्यानें फिल्म्स् तयार केल्या. देश संकटांत आहे हें या श्रेष्ठ कलावंतानें निष्ठेनें ओळखलें होतें.

दुसरें महायुद्ध संपलें. स्टुडिओची पुनर्रचना झाली. भांडवल उभें करावयाचें होतें. युद्धकाळांत प्रचाराचीं चित्रें तयार झालीं त्यांतून फायदा कसला? पण पुनः नव्या धैर्यानें सर्व उभारणी झाली. सिंड्रेला, अलाइस इन् वंडरलँड व पीटर पॅन यांनीं प्रेक्षकांचीं मनें पुनः काबीज केलीं. निसर्गचित्रणाकडे अधिक लक्ष द्यावें असें वॉल्ट डिस्नेनें ठरविलें. सिंड्रेला खूपच गाजली. स्नो-व्हाईटप्रमाणें तिनें अलोट पैसा आपल्या निर्मात्यास मिळवून दिला. टेलिव्हिजनवरहि डिस्नेचे कार्यक्रम गाजूं लागले. फँटेशिया, सील आयलंड,





दि लिव्हिंग डेझर्ट, दि व्हॅनिशिंग प्रेअरी, मेन अगेन्स्ट दि आर्टिक, सीक्रेट्स ऑफ नेचर इत्यादि फिल्म्स् फारच लोकप्रिय झाल्या. एखादा नवा विषय वॉल्ट डिस्नेनें घ्यावा व त्याचें सोनें करून दाखवावें असेंच जणू ठरून गेलें. विनोदी कार्टून्स व निसर्गचित्रण यांत त्याचा हात कोणी धरणारें नव्हतें. बहुतेक दर वर्षीं त्याच्या कोठल्या ना कोठल्या तरी चित्रपटास मोठें पारितोषिक मिळतेंच. गेल्या वीस वर्षांत त्याला वीसपंचवीस वेळां सर्वोत्तम असे बहुमान पारितोषिकाच्या रूपानें मिळाले आहेत. सर्व जगांतील मुलांना त्याचें नांव प्यारें आहे.

कॅलिफोर्नियांतील लॉस एंजलस येथें त्यानें उभारलेली ‘ डिस्ने लँड ’ म्हणजे अदभुत अशी यक्षभूमि आहे. पंधरा कोटी डॉलर्स खर्चून त्यानें ही करमणुकीची भूमि निर्माण केली आहे. येथे करमणूक आहे व ज्ञानसाधन पण आहे. जगांतील अनेक रसिक प्रवासी वॉल्ट डिस्नेच्या या स्वप्नभूमीला भेट देतात नि खूष होतात. फँटसी लँड, ॲडव्हेंचर लँड, टुमॉरो लँड, फ्रॉंटियर लँडमधून भटकतांना पाहणारा दिपून जातो. निसर्गाचे, शास्त्रीय प्रगतीचे



अनेक चमत्कार येथें उभे आहेत. अद्भुत आणि वास्तव यांचें चमत्कारिक मिश्रण येथें दिसेल. मोठे डोंगर, दऱ्या, नद्या, तलाव, धबधबे डिस्नेलँडमध्ये उभे केले आहेत. या कृत्रिम निसर्गाच्या अंकावर नाना प्राणी खेळतात. त्यांच्याकडे पाहून माणसानें गुंग होऊन जावें. ॲडव्हेंचर लँडमधून जातांना नाना प्राणी, नाना निसर्गदृश्यें, वन्यजमाती यांचें दर्शन होऊन आपलें अंतःकरण चरकून जातें. फँटसी लँडमधील सात बुटक्यांची खाण, चेटकिणीचें घर पाहून मन भीतीनें गांगरून जातें. टुमॉरो लँडमधील शास्त्रीय प्रगति थक्क करणारी वाटते. पाण्यासारखा पैसा वॉल्ट डिस्नेनें या अद्भुत नगरीवर ओतला आहे. डिस्नेची नवनिर्माणशक्ति येथें मूर्तिमंत उभी आहेशी वाटते. दर वर्षीं मोठा खर्च करून यांत भर पडत असते. लहान-थोर, स्त्री-पुरुष साऱ्यांना या यक्षभूमीचा मोठा लोभ वाटतो. सन १९५५-५६ च्या पहिल्याच वर्षीं प्रवासी प्रेक्षकांकडून डिस्नेलँडला १८७६९२ डॉलर्सचा फायदा झाला !

वॉल्ट डिस्नेला मुलांचा, निसर्गाचा, प्राण्यांचा मोठा लळा. जुन्या गाड्या, मोटारी, आगगाड्या, यांचीं प्रतीकें करून त्याच

विशिष्ट वातावरणांत पुनः जाण्यांत विशेष समाधान त्यास वाटतें. आपलें जुनें खेडें, जुनी शेतवाडी, जुनें घर यांच्याच धर्तीवर तो स्वतःचें नवें घर बांधील. आपल्या नातवंडांसाठी, मुलींच्या मुलांसाठी नाना प्रकारचीं खेळणीं तो तयार करील. एकदां तर १८९० सालचें मॉडेल तयार करून त्यानें एक रेल्वे-इंजिनच निर्माण केलें आणि तें स्वतः चालवतांना तो जुन्या ड्रायव्हरप्रमाणें पोषाख करील आणि मुलांच्याबरोबर आनंदांत काळ घालवील. नव्या घराच्याभोवतीं सर्वत्र रेल्वेचे रूळ असावेत असा त्याचा एकदां चमत्कारिक हट्ट होता. जर हे रूळ नसतील, तर मग नवें घर तरी कशासाठी? असा त्याचा मुद्दा असे. त्या रुळांवरून त्याची स्वतःची खेळांतली खरी गाडी जाणार होती. रेल्वे-रूळ, गाडी, बोगदे, स्टेशन हा सर्व प्रकार आलाच. डिस्नेच्या मनांत अशीं अनेक ' वेडें ' असतात.

वॉल्ट डिस्नेच्या घरीं मुलींची संख्या जास्त. डायनी आणि शेरॉन या त्याच्या मुली. त्याच्या घरीं कुत्री व्याली तरी तिला कुत्रीच होणार; कुत्रा नाहीं. आपल्या मुलींच्यावर, नातवंडांवर, भोंवतीच्या प्राण्यांवर त्याचें भारी प्रेम. बागबगीचा हा तर त्याच्या आवडीचा उद्योग. बगीच्यांत नाना फळें, नाना फुलें नेहमीं तयार असत. परिपक्क झालेलीं किंवा होत असलेलीं फळें बहुधा पक्षी किंवा खारी खाऊन टाकीत. पक्ष्यांना वा खारींना दूर करणें






वाल्टला मान्य नाहीं; पिंजरा लावून खारी पकडणें मंजूर नाहीं, तो नेहमीं म्हणतो, 'खार किती नाजुक, गोजिरवाणी, परमेश्वराची खरी कलाकृति.' स्ट्रॉबेरीज नष्ट करणाऱ्या खारींचा बंदोबस्त करण्यास एकदां त्याची बायको निघाली, तेव्हां तो म्हणाला, 'लिली, तुला स्ट्रॉबेरीज हव्यात तर तूं बाजारांत जाऊन आणूं शकतेस; बिचाऱ्या खारींना तसें करतां येईल काय ?" कुत्र्यांचा असाच लळा वाल्ट डिस्नेला आहे. त्याच्या बायकोला मात्र ही असली कटकट नको असते. कुत्रें कसलें पाळावयाचें? घरांत सगळी घाण आणि उग्र वास त्याचा. वाल्टनें कुत्र्यांच्या बहुतेक सर्व जातींचा अभ्यास केला आणि ज्याची बिलकूल घाण वाटणार नाहीं असा एक कुत्रा ख्रिस्तमसच्या निमित्तानें त्यानें आपल्या पत्नीस भेट दिला. तो तिला आवडलाही. निसर्गावर, पक्ष्यांवर विविध प्राण्यांवर जसें वाल्ट डिस्नेचें प्रेम आहे, तसेंच किंवा त्याहून अधिक प्रेम आपल्या मानसिक प्रजेवर त्याचें आहे. मिकी माऊस, डोनाल्ड डक, गूफी, सेवन ड्वार्फ्स, स्नो-व्हाईट, सिंड्रेला इत्यादि त्याच्या प्रजेवर त्याचें खूप प्रेम आहे.



आणि अलीकडे तर त्याच्या कल्पनेंत निसर्गचमत्कार, प्राणिसृष्टि, वाळवंटें, जंगलें, कीटक, पक्षी, फुलें यांतील सौंदर्य तीव्रतेनें उमटलेलें दिसतें. याच कारणासाठीं हत्तीवर तो एखादी फिल्म काढतो, अंटार्टिकामधील पेंग्विनवर तो खूष असतो, आफ्रिकन लायन त्याच्या चित्रपटाचा





नायक बनतो, 'व्हॅनिशिंग प्रेअरी' हें त्याचें चित्र यामुळें गाजतें. यांत त्याला एक प्रकारचें साहस वाटतें. प्राण्यांच्या जीवनांतील दैनंदिन व्यवहार त्याचा कॅमेरा टिपूं लागतो वरवर उघडा बोडका दिसणारा भूभाग किती सजीव आहे हें त्याच्या ध्यानीं येतें. रात्र झाली कीं या माळरानावर कोणते प्राणी भटकतात हें पाहून त्याचें मन चकित होतें. त्यांच्या एकमेकांची शिकार कशी होते, त्यांची धावपळ कशी असते, त्यांच्या संवयी कोणत्या असतात; नाना प्राणी, नाना पक्षी यांनीं रान कसें गजबजून जातें इत्यादींचें खरें दर्शन आपणांस वॉल्ट डिस्ने घडवितो.

याच भागांत मग एखादा वाळवंटाचा टप्पा लागतो. उदास, निर्जन, रुक्ष वाळवंट ! कोण तेथें लक्ष देणार ? सर्वत्र खडकाळ प्रदेश, झाडें एकाच प्रकारचीं, उंच उंच वाटणारे कॅक्टस निवडुंग, त्यांचे चित्रविचित्र आकार, त्यांचें वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप, या सर्वांतील सौंदय वॉल्ट डिस्नेच्या दृष्टीस जाणवतें आणि मग त्याच्या चिरतरुण प्रतिभेंतून लिव्हिंग डेझर्ट जन्मास येतें. उदास, रुक्ष, निर्जीव वाटणारें वाळवंट त्याच्या ममत्वाच्या स्पर्शानें हलूं लागतें, सजीव होतें; त्याला विविध जीवनाचे पाझर फुटूं लागतात. गुलाबाचें, जाईजुईचें, रातराणीचें कौतुक आतांपर्यंत झालें. पण डोंगराळ वाळवंटाचें, निवडुंगाच्या फुलांचें कौतुक डिस्नेच्या दृष्टींत तयार झालें. नाना पक्षी, खारी, विंचू, सर्प, सरडे, गोमी, कोळी, पुंगळ, मुंग्या, मुंगळे, माशा, लांडगे, तरसें, डुकरें, ससे,



घुबडें, कोल्हे, हरणें यांसारखे लहान-मोठे प्राणी वॉल्ट डिस्नेच्या चित्रपटांत काम करतात. जीवन-मरणाची एक भयानक सृष्टि येथें अवतरलेली असते. येथेंहि राग असतो, लोभ असतो, मत्सर असतो, द्वेष असतो, वात्सल्य असतें, प्रेम असतें; पण या सर्वांना टिपून घेणारी वाल्ट डिस्नेची दृष्टि हवी असते. ती असली कीं, हें सर्व वाळवंट आहे तशा जिवंत स्वरूपांत पडद्यावर उभें राहतें आणि त्याचें दर्शन घेत असतांना एका क्षणाचाहि कंटाळा येत नाहीं, नायिकेचें रडगाणें कंटाळवाणें वाटत नाहीं; हिडिस शृंगार मनांत उद्वग निर्माण करीत नाहीं. येथें एक वेगळेंच विश्व उभें राहिलेलें असतें आणि त्यावर फक्त एक छाप असतो, तो म्हणजे वाल्ट डिस्ने याच्या अभिजात प्रतिभेचा, उन्मत्त कल्पनेचा !

यामुळें वॉल्ट डिस्नेची ‘ लिव्हिंग डेझर्ट ’ ही एक अमर कलाकृति झाली आहे. काश्मीर वा स्वित्झर्लंड येथील बागबगीच्यांमधील सौंदर्य नेहमींच टिपलें जाईल. पण उदास व रणरण करणाऱ्या ओसाड वाळवंटांत कांहीं प्राणिजीवन असूं शकतें, हेंहि आपणांस माहीत नसतें. अमेरिकेच्या पश्चिमेस असणाऱ्या दि ग्रेट अमेरिकन डेझर्टकडे अजूनहि कुणाचें लक्ष नव्हतें. वॉल्ट डिस्नेनें तेथील निसर्ग आपल्या पडद्यावर प्रथम उभा केला. येथें कांहीं झुडपें बहुधा निवडुंगांच्या जातीचीं आहेत. यांना बहुधा पानें नाहींत. पानांना पाणी पुष्कळ लागतें ना ! आणि येथें तर पाण्याची पंचाईत; जेमतेम मिळेल तेवढें पाणी खोडांतच साठवून ठेविलेलें. खोड पुनः वरून कांटेरी म्हणजे कुणास त्याचा लोभ वाटूं नये. तीव्र असें जीवन जगण्यासाठीं खटाटोप करून, झगडून जगण्यासाठीं आहे, हा इथला संदेश. उभ्या जीवनासाठीं लागणारें पाणी जपून जपून वापरावें लागतें. बॅरल कॅक्टस ( निवडुंग ) ही एक जात पाहण्या-




सारखी आहे. एखाद्या डेऱ्याच्या आकाराची. धरून काटेरी रूप, आंतून पाण्याचा साठा, कुणाला कळूं नये असा; शेंडयाला मात्र तांबडीं फुललेलीं फुलें. दुर्मिळ असणाऱ्या पाण्यासाठीं कुणी येणार नाहीं. कारण काटेरी शस्त्र सबंध अंगावर आहेच.

मी भटकत होतों त्या भागांत सव्हॅरो निवडुंगाचें रानच रान सोळा सतरा मैल पसरलें होतें. सव्हॅरो ही एक निवडुंगाची जात. उंचच उंच वाढणारी. चारपांच पुरुष उंच वाढणारी. या झाडास ना फांद्या, ना पानें. एखादंदुसरी खोडासारखीच वाटणारी फांदी बाजूनें फुटून वेडी वाकडी वर गेली असेल. अशीं निरनिराळ्या आकाराचीं झाडें खरेंच शोभिवंत दिसत होतीं. मध्येंच एखाद्या झाडाच्या खोडाच्या खोबणींत पक्ष्यांनीं आपलीं घरटीं केलीं होतीं. त्यांत त्यांचीं अंडीं होतीं. वॉल्ट डिस्ने यांनीं या सर्वांची नोंद घेतली होती. माझ्याजवळहि एक चांगला कॅमेरा होता. मीहि कांहीं चित्रें घेतलीं. एक लहानशी मूव्ही फिल्महि मी या लिव्हिंग डेझर्टची घेतली आहे. वॉल्ट डिस्नेच्या चित्रपटांतील निवडुंगाच्या ढोलींतील घुबड माझ्या स्मरणांत होतें. सव्हॅरो निवडुंगाच्या शिखरावर जाऊन प्राण रक्षण करणाऱ्या त्यांतील वॉब कॅटचीहि स्मृति मला झाली. कांसवें पाण्यांत वा पाण्याशेजारीं राहतात अशी माझी समजूत. पण या वाळवंटांत कासव आहेच ! आकारानें लहान. या कांसवांचें जीवन किती रोमहर्षक पद्धतीनें वॉल्ट डिस्ने यांनीं चित्रित केलें आहे. त्यांची लढाई व त्यांचें एकमेकांवरील प्रेम यांना तुलना नाहीं. खारीवर वॉल्ट डिस्नेचें भारी प्रेम. पेरि नांवाचें एक सबंध चित्रच त्यांनीं खारीच्या जीवनावर काढलें आहे. लिव्हिंग डेझर्टमध्यें खारी आहेतच. दगडाचा भाग समजून त्यावर उभी राहिलेली खार झाडाचा पाला ओरबाडून लुबुलुबु खात आहे आणि पायाखालीं



कांसवाची पाठ आहे हें दृश्य किती गंमतीचें !

ज्यांचीं नांवेंहि आपणांस माहित नाहींत असे किती तरी लहान-मोठे प्राणी या वाळवंटांत आहेत. पालींचे तरी किती प्रकार. सबंध पाठीवर उभा असणारा पडद्यासारखा तुरा सरपटणाऱ्या प्राण्याचा पाहून अगदीं प्राचीन काळचे प्राणी आठवावेत. उंदीर व साप यांची नित्याची लढत येथें आहेच. आपल्या पिलांना जमिनीखालच्या बिळांत ठेवून आई बाहेर गेलेली आणि सर्पराज वेगानें बिळाकडे धावत येताहेत, आईस समजतांच ती अधिक वेगानें दुसऱ्या मार्गानें बिळांत जाऊन पिलांना वाचविते—हा चित्तथरारक प्रसंग वॉल्ट डिस्नेच्या कॅमेऱ्यानेंच टिपावा. रानटी हॉक पक्षी व सर्प यांची झुंजहि पाहण्यासारखी आहे; आणि विंचवांचें प्रणयनृत्य कोण विसरणार ? उलट्या टांगून घेणाऱ्या वटवाघुळांना येथें स्थान आहेच. रात्रीं भटकणाऱ्या व भक्ष्य शोधणाऱ्या वेडकांची स्वारी कीटकांवर कशी झडप घालते हें येथेंच पाहून घ्यावें. असंख्य पायांच्या गोमी या चित्रपटांत



वळवळ करतांना दिसतील. सर्पांच्या नाना गती वाळूवर उमटणाऱ्या स्पष्ट चिन्हांनीं प्रकट होतील. कांगारू रॅट (उंदीर) व सर्प यांची अचानक भेट अंगावर शहारे आणणारी आहे. लिव्हिंग डेझर्टचे असे किती म्हणून नमुने सांगावेत? प्रारंभापासून अखेरपर्यंत उत्कंठित करणारें व प्रमुख मानवी



भावनांचें नृत्य दर्शविणारें हें वॉल्ट डिस्नेचें अप्रतिम चित्र आहे.

याच धर्तीवरचीं आणखी कांहीं चित्रें वॉल्ट डिस्ने यांनीं तयार केलीं आहेत. 'सील आयलंड' हें अलास्कामधील सील माशांची कथा सांगणारें चित्र १९४८ मध्यें सर्वोत्कृष्ट ठरलें. आल्फ्रेड मिलॉटी व त्याची बायको एल्मा हे दोघे अलास्काच्या वर्फाळ प्रदेशांतच कित्येक वर्षें राहिले होते. डिस्नेसाठीं कित्येक फूट फिल्म घेत होते. सील आयलंडला कमालीची लोकप्रियता मिळाली, तेव्हां यानंतरचें चित्र तयार झालें 'इन बीव्हर व्हॅली.' बीव्हर हा एक उद्योगी प्राणी. कॅमेरे सरसावून वर्षभर पर्यंत प्रयत्न झाले आणि बीव्हरच्या जीवनावर एक कथात्मक चित्र तयार झालें. 'दि व्हॅनिशिंग प्रेअरीं' मध्यें असेंच प्राणिजीवनाचें नितान्तरम्य व अद्‌भुत असें दर्शन आहे.

प्राण्यांचें खरेंखुरें जीवन चित्रित करण्याची कल्पना वॉल्ट डिस्नेस सुचली ती प्राण्यांवरील त्याच्या निस्सीम प्रेमामुळेंच. आठ-आठ, दहादहा मिनिटें चालणारीं त्यांचीं कार्टून्स फार लोकप्रिय झालीं होतीं तरी स्वतंत्र चित्रपटाचा दर्जा त्यांना नव्हता. ही रुखरुख थांबण्यासाठीं त्यानें एक प्रचंड साहस केलें. तें म्हणजे मागें सांगितलेलें 'स्नो-व्हाईट' हा संपूर्ण चित्रपट निर्माण करण्याचें. या चित्रपटानें त्यास अमाप पैसा व लौकिक मिळवून दिला. आणि याच चित्रपटांत स्नो-व्हाईटभोंवतीं अनेक प्राणी वॉल्ट डिस्नें यानें जमविले होते. मिकी-माऊस, डोनाल्ड डक हे तर त्याचे नित्याचे साथीदार, पण सबंध चित्राच प्राण्यांवर काढावें अशी त्याची मनीषा होती. बॅंबी हें प्राणिजीवनावर एक कार्टूनचित्र हरिणशावकाच्या जीवनावर त्यानें तयार केलं. यासारखीं आणखी कांहीं चित्रें तयार झालीं. पण यांतून समाधान नव्हतें. स्टुडिओंत



प्राणी पाळण्यास प्रारंभ झाला; पण हे पाळीव प्राणी; त्यांचें खरें दर्शन स्टुडिओंत होईना. मग मात्र वॉल्ट डिस्नेचे साथीदार कॅमेरे घेऊन प्रत्यक्ष जंगलांत गेले. तासनतास, दिवसेंदिवस कॅमेरे लावून बसले आणि मग कॅमेऱ्यांनीं केलेल्या शिकारींतून व वॉल्ट डिस्नेच्या अद्वितीय कल्पकतेंतून त्याचीं निसर्गचित्रें प्रकट झालीं. नित्य नवा प्रयोग याहि क्षेत्रांत त्यानें चालू केला.

अगदीं अलीकडे आणखी एक नवा उपक्रम डिस्ने स्टुडिओंत चालू आहे. एप्रिल १९६४ पासून फोर्ड मोटरकंपनीतर्फे न्यूयॉर्कला जें प्रदर्शन भरलें आहे त्यांत वॉल्ट डिस्ने कांहीं दृश्यें उभीं करणार आहेत. विशेषतः अगदीं प्राचीन काळीं माणसें कशीं होती, त्यांच्या गुहा कशा होत्या, हत्तीसारख्या मोठमोठ्या प्राण्यांची शिकार ते कसे करीत यांचें प्रत्यक्ष दर्शन येथें होणार आहे. 'ऑडिओ-ॲनी मॅट्रॉनिक्स' नांवाचें नवें तंत्र येथें उपयोगांत येणार आहे. प्लॅस्टिक्सचे, तारांचे, पोलादाचे प्राणी येथें हालचाली करणार आहेत. पक्षी आपल्या चोची उघडतील, शेपट्या हलवतील, माना वेळावतील; आणि याच वेळीं त्यांचे निरनिराळे आवाजहि ऐकूं येतील. निर्जीव प्राणी हलूं लागेल, बोलूं लागेल. प्राचीन काळच्या माणसाच्या हालचाली आतां प्रत्यक्ष दिसतील.






अनुक्रम ३५६६०
नों. दि. २६/१२/४६


डिस्ने यांच्या कल्पकतेची आणखी एक चमक! शंभर वर्षांपूर्वी म्हणजे सन १८६५ सालीं दिवंगत झालेल्या अमेरिकेच्या लाडक्या अध्यक्षाला अब्राहम लिंकनला, त्यानें सजीव केलें आहे. तोच तो अब्राहम लिंकन. गरिबांचा कैवारी, गुलामांचा मुक्तिदाता लिंकन. तीच उंची, तीच व्यक्तिरेखा, तोच चेहरा, तीच केसांची ठेवण, कपडेहि तेच, परिश्रमांनीं थकलेली मूर्ति—आज १९६४ सालीं पुन्हा आपल्या समोर येत आहे. वॉशिंग्टन येथें लिंकन स्मारक आहे, तेथें खुर्चीत बसलेला भव्य पुतळा आहे. वॉल्ट डिस्नेनें तयार केलेला ‘ लिंकन ’ लिंकन एवढाच आहे. थोडी यांत्रिक जुळवाजुळव केली कीं हा लिंकन खुर्चीवरून उठूं लागेल. त्याच्या डोळ्यांत उघडझाप होईल, ओठावरून जीभ फिरेल, घसा खाकरला जाईल. कपाळावर थोडी आठी येईल, खुर्चीचे दोनहि हात घट्ट पकडले जातील, लिंकन उभा राहील आणि बोलूं लागेल ‘व्हॉट कॉन्स्टीटयूटस दि बलबर्क ऑफ आवर ओन लिबर्टी ॲंड इन्डिपेंडन्टस ?’ आणि या प्रश्नाला तोच उत्तर देण्याचा प्रयत्न करील, ‘अवर रिलायन्स इज इन दि लव्ह ऑफ् लिबर्टी विच गॉड हॅज प्लँटेड इन अस....’ अब्राहम लिंकनचें हें अद्भुत दर्शन नव्या पिढीस किती उत्साहवर्धक वाटेल ! वीस ते बत्तीस कृत्रिम हालचाली करणारा हा लिंकन सर्व अमेरिकन लोकांना पुनः नादावून सोडील असाच आहे. सिनेरामा, सर्कीरामा, यांसारखाच वाल्ट डिस्नेचा हाहि यांत्रिक लिंकनचा प्रयोग पुनः एकदां सर्व जगास हलवून सोडणारा होईल यांत शंका नाहीं. वॉल्ट डिस्नेच्या प्रतिभेची किमया ही अशी आहे !



* * *

म. ग्रं. सं. ठाणे.
IRBK-0110793


D


फेंटसी लॅंड
फ्रंटिअर लॅंड
टुमॉरो लॅंड
अॅड्व्हेंचर लॅंड
मेन स्ट्रीट
डिस्ने लॅंड